राज्य शासनाचे मा.मंत्री महोदयांचा इतर राज्यातील दौ-याचा तपशिल राजशिष्टाचार विभागास न पाठविता परस्पर मंत्री कार्यालयातून संबंधित राज्याच्या मुख्य सचिवांकडे पाठविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः टिआरएस-१४१७/प्र.क्र.२०६/३०

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २६ डिसेंबर, २०१७

शासन परिपत्रक :-

राज्य शासनाचे मंत्री जेव्हा कामानिमित्त दौ-यावर इतर राज्यात जात असतात. तेव्हा संबंधित मंत्री कार्यालयाकडून त्यांच्या दौ-याचा तपशिल तपासून या कार्यालयास प्राप्त होत असतो. तद्नंतर दौ-याचा तपशिल राजशिष्टाचार विभागाकडून संबंधित राज्यांच्या मुख्य सचिवांकडे फॅक्सव्दारे पाठविण्यात येतो. इतर राज्याचे मा.मंत्री/राज्यमंत्री यांचा दौरा कार्यक्रम संबंधित राज्याचे राजशिष्टाचार विभागाऐवजी थेट मंत्री कार्यालयाकडून या विभागास प्राप्त होतो. याअनुषंगाने ब-याचदा असे निदर्शनास आले आहे की, मा.मंत्री त्याच दिवशी रात्री किंवा दुस-या दिवशी सकाळी लवकर इतर राज्याच्या दौ-यावर जात असल्याने इतर राज्यातील कार्यालयीन वेळेनंतर दौरा कार्यक्रम पाठविले गेल्याने त्यावर कार्यवाही होण्यास विलंब होतो. त्यामुळे संबंधितांची गैरसोय होण्याची शक्यता असते. मध्यंतरीच्या काळात असेही निर्दशनास आले की, मंत्री महोदयांच्या दौ-याच्या कार्यक्रमात ऐनवेळी बदल होतो किंवा दौरा रद्द होतो. परंतु त्याबाबत संबंधित राज्यास कळविण्यात येत नाही. अशावेळी त्या राज्यातील संबंधित यंत्रणा राजशिष्टाचार विभागाशी संपर्क साधते. मात्र त्यावेळेस राजशिष्टाचार शाखेस याची कल्पना नसल्यामुळे समस्या निर्माण होतात . उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेऊन खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. :-

मा.मंत्री/राज्यमंत्री कार्यालयात सध्या संगणक/इंटरनेट सुविधा तसेच एस.टी.डी. सुविधेसह दूरध्वनी/फॅक्स यंत्रणा या सर्व आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्यामुळे दि. १ जानेवारी, २०१८ पासून राज्य शासनाचे मा.मंत्री/राज्यमंत्री इतर राज्यात दौ-यावर जाणार असतील तर इतर राज्यातील दौरा कार्यक्रम संबंधित मंत्री कार्यालय किंवा विभागाने प्रमाणित करुन परस्पर संबंधित राज्यातील मा. मुख्य सचिव, मा.पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावेत. दि.१.१.२०१८ या दिनांकापासून मा.मंत्री/राज्यमंत्री यांचा इतर राज्याचा दौरा राजशिष्टाचार कार्यासनामार्फत फॅक्सव्दारे संबंधित राज्यात पाठविण्याची प्रचलित पध्दत बंद करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१२२६१५५५१४०६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish K Jondhale

Digitally signed by Satish K Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish K Jondhale
Date: 2017.12.26 16:13:55 +05'30'

(सतिश जोंधळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव,
२. सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव मंत्रालयीन विभाग,
३. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.विधानसभा अध्यक्ष/विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव
६. निवडनस्ती.